E-14

खरेदी खत

गट नं. २४४ ( Part - I)

२४४

२४४

SDRs. 32001-
[illegible]

पावती क्र.

नोंदणी ३९ म.
Regn. 39 m.

दस्तऐवजाचा/अर्जाचा अनुक्रमांक ११८७/९५

दिनांक १०/१०/९५ सन १९

दस्तऐवजाचा प्रकार— खरेदीखत

[illegible]

सादर करणाराचे नांव— [illegible]

खालीलप्रमाणे फी मिळाली:—

| | रु. | पै. |
|---|---|---|
| नोंदणी फी | ७०० | |
| नक्कल फी (फोलिओ २५) | | |
| पृष्ठांकनाची नक्कल फी | | |
| टपालखर्च | ३० | |
| नकला किंवा ज्ञापने (कलम ६४ ते ६७) | | |
| शोध किंवा निरीक्षण | | |
| दंड—कलम २५ अन्वये | १२ | |
| कलम ३४ अन्वये | | |
| प्रमाणित नकला (कलम ५७) (फोलिओ ) | ०१ | |
| इतर फी (मागील पानावरील) बाब क्र. | | |
| ,, ,, | ०२ | |
| ,, ,, | १५ | |
| ,, ,, | | |
| ,, ,, | | |
| एकूण | ८००=०० | |

Rs. 840/-

दस्तऐवज / नक्कल रोजी तयार होईल व नोंदणीकृत डाकेने पाठवली जाईल. / या कार्यालयात देण्यात येईल.

दुय्यम निबंधक.

दस्तऐवज खाली नाव दिलेल्या व्यक्तीच्या नावे नोंदणीकृत डाकेने पाठवावा. / हवाली करावा

सादरकर्ता

1000R

INDIA NON JUDICIAL

१000रु.  Rs 1000

सत्यमेव जयते

भारत

एक हजार रुपये ONE THOUSAND RUPEES

९६३० ६/१०/९५ 3000/- १०००/-

अनुक्रमांक - ९९८७/९५

सन १९९५ च्या ऑक्टोबर

१० दिनांकास १:०० ते २:०० चे

दरम्यान दुय्यम निबंधक इगतपुरी यांचे कार्यालयात आणून दिला.

For JYOTI STRUCTURES LTD

T. N. G. PILLAI
GEN MANAGER (CONSTN)

दुय्यम निबंधक, इगतपुरी

| | |
|---|---|
| मी वसूली नी: | रुपये पै |
| नोंदणी फी:- | ६८०/- |
| नकल को (फोलिओ) | ३०/- |
| पेरे फी:- ९५ | ९२/- |
| टपाल फी:- | ०१/- |
| इतर फी:- | ०२/- |
| | ९४/- |
| एकूण फी:- | ८४०/- |

दुय्यम निबंधक, इगतपुरी

| इ ग त |
|---|
| ९९८७/९५ |
| १९९५ |

"श्री"

* फरोक्त खरेदीखत *

फरोक्त खरेदीखत आज दिनांक ९ माहे ऑक्टोबर इसवी सन १९९५ रोज सोमवार ते दिवशी इगतपुरी मुक्कामी:-

[२]..




[illegible handwritten endorsement]

..[२]..

| इ गत |
| --- |
| [illegible]/२१७५ |
| १९९५ |

मे. ज्योती स्ट्रक्चरल लि., इंडियन कंपनीज अॅक्टान्वये नोंदलेली कंपनी यांचे रजि. ऑफिस, मुंबई येथे असुन शाखा प्लॉट नं. ५२/५३, एम.आय.डी.सी., सातपूर, नाशिक-४२२ ००७ ... लिहून घेणार.

- यांसी -

१] मारुती बाळु तोकडे, उ.व.-५० ... लिहून देणार.

[३]..




..[३]..

| | | |
|---|---|---|
| २] गणपत बाळु तोकडे, उ. व. -४६<br>३] भागाबाई बाळु तोकडे, उ. व. -६५<br>सर्वांचा धंदा- शेती, सर्व<br>राहणार- देवळा, ता. इगतपुरी<br>जिल्हा नासिक. | | इगत<br>११८७/३/९४<br>१९९४<br>लिहून देणार. |
| - यांसी - | | |
| १] श्री. चंद्रसेन शंकरराव रोकडे,<br>उ. व. -५०, धंदा- शेती.<br>राहणार-नांदुर वैद्य, ता. इगतपुरी | | संमती<br>देणार. |

[४]..

[५]..

इ ग त
९९१७/४९५
१९९५

२] श्री. चंद्रकांत त्र्यंबक राजेबहादर
उ. व. -५४, धंदा-शेती
राहणार- नासिक.

कारणे फरोक्त खरेदीखत लिहून देतात
ऐसा जे की.,

[१] मिळकतीचे वर्णन * तुकडी जिल्हा नासिक, पोट तुकडी तालुका इगतपुरी पैकी मौजे गांव उभाडे या गांवचे शिवारातील मिळकत यांसी गट नंबर २४४ यांसी पुर्वीचा सर्वेनंबर २६२/१ व २६२/६ यांसी क्षेत्र हेक्टर १.२६ आर पोट खराब्यासह यापैकी १/२ हिश्याची मिळकत म्हणजेच हेक्टर ००.६३ आर, यांसी आकार रुपये ००.७८ पैसे यांसी चतु:सिमा:-

| | |
|---|---|
| पुर्वेस | :- गटनंबर २४३ |
| पश्चिमेस | :- गटनंबर २५१ |
| दक्षिणेस | :- गटनंबर २४४ हिस्सा |
| उत्तरेस | :- उभाडे गांवची शिव. |

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत शेतजमिन जल, तरु, काष्ट, पाषाण, निधी-निक्षेपासह व तदंगभुत वस्तुंसह आणि आम्हांस प्राप्त असलेल्या हक्कासह व वागवहिवाटीच्या हक्कासंहची दरोबस्त मिळकत.

[२] उपरोक्त कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत ही आमची वडिलोपार्जित अशी मालकीची असुन आमचेच कब्जावहिवाटीत आहे. सदर मिळकतीची पाहिजे तशी विल्हेवाट लावण्याचा आम्हांस हक्क व अधिकार आहे.

इ ग
२२१७ /५१
१९९५

[३] वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीची किंमत ही तुमचे व आमचे दरम्यान दर एकरी रक्कम रुपये ५०,००० [ रुपये पन्नास हजार मात्र] इतकी ठरलेली असुन मिळकतीची एकुण किंमत रक्कम रुपये ७७,८३९,६५-[ रुपये सत्याहत्तर हजार आठशे एकोनचाळीस आणि पासष्ट पैसे मात्र] अशी ठरलेली असुन सदरची किंमत ही आजचे बाजारभावाप्रमाणे योग्य व बरोबर असुन किंमतीबाबत माझी/आमची काही एक तक्रार नाही.

[४] वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा खुला व निर्वेध असा तुम्हांस कब्जा आज रोजी प्रत्यक्ष मिळकतीवर नेवुन दोन साक्षीदारा समक्ष मोजुन मापुन हद्दीच्या खुणा व निशाण्या दर्शवुन मिळकतीत तुम्ही हिंडुन फिरुन कब्जा घेतला आहे. आता सदर कब्जाचा तुम्ही मनमानेल तसा वंशपरांपरागत उपभोग घ्यावा तुमच्या कब्जास वहिवाटीस कोणी काही हिस्सा हरकत केल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदरखर्चाने करुन देवु त्याची तोशिष तुम्हांस लागु देणार नाही.

[५] लिहून घेणार तुम्ही कंपनी असल्याने सदर मिळकतीचा वापर औदयोगिक कारणासाठी करणार आहात त्यामुळे सदर व्यवहाराकामी/खरेदीखताकामी कोणत्याही

इ ग त
११७/६१५
१९९५

करणार आहात त्यामुळे सदर व्यवहारासाठी/खरेदीखताकामी कोणत्याही परवानगीची आवश्यकता अगर मिळकत बिनशेती करण्याची गरज नाही असा संदर्भ महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दि. २ फेब्रुवारी १९९४ मध्ये नमुद केलेला आहे.

[६] वर वर्णन केलेली मिळकत खरेदी देणार यांनी संमतीदार यांचे बरोबर विसार पावती केली होती त्या विसार पावती पोटी वेळोवेळी संमतीदार यांचेकडुन आजपावेतो रक्कम रुपये 3000/- [तीन हजारमात्र] घेतलेली आहे. सदर संमतीदार यांना खरेदी देणार यांनी सदर जमिनीच्या विक्री बाबत विसार पावती लिहून दिलेली होती परंतु सदर जमिनीचे व्यवहार लिहून घेणार कंपनी बरोबर झालेले संमतीदार यांना रुपये 3000 तीन हजार मात्र] परत केलेले आहे. सदर व्यवहार रद्द केले बाबत संमतीदार यांची काही एक तक्रार नसुन त्यांनी या खरेदीखतावर संमतीदार म्हणुन सही केलेली आहे.

[७] उपरोक्त मिळकत आम्ही तुम्हांस कायम करोपेत खरेदी दिली आहे. आता सदर मिळकतीशी आमचा काही एक संबंध, हक्क राहिलेला नाही. सदर मिळकतीचे तुम्हीच पुर्णपणे मालक झालेले आहात. सदर मिळकतीचा तुम्ही आता तुम्हांस पाहिजे तशी विक्री, विल्हेवाट लावावी. तुमचे कब्जास, मालकी हक्कास, कोणीही हिस्सा

[७]..

इ ग त
९९७/८७५
१९९५

हरकत केल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदरखर्चाने करून देवु त्याची तोशिष तुम्हांस लागु देणार नाही.

[८] सदर मिळकतीवर गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, बक्षीसपत्र, तारण, मृत्युपत्र, `ई कुळ, वारस, जप्ती जामिनकी, कोर्टवाद, हद्दीचा वाद, इजमेंट असा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा बोजा नाही.

[९] उपरोक्त मिळकती बाबत दिनाक २५/९/९५ रोजी दैनिक गांवकरी मध्ये श्रीयुत धर्माधिकारी ॲडव्होकेट याचे मार्फत जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यांत आली होती. सदर नोटीसवर जाहीरात द. गांवकरी मध्ये दि. २५/९/१९९५ रोजी प्रसिध्द केल्यापासुन आजतागायत म्हणजे हया खरेदीखताच्या तारखेपावेतो कोणीही कोणत्याही प्रकारची तोंडी अथवा लेखी हरकत घेतली अथवा नोंदविलेली नाही.

[१०] उपरोक्त मिळकतीचे विक्री संबंधी यापुर्वी अन्य कोणाही बरोबर तोंडी लेखी करार केलेला नाही. त्यामुळे मिळकतीचो विक्री करण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आम्हांस आहे.

[११] उपरोक्त मिळकती संबंधाने कोणत्याही कोर्टात दावा चालु नाही अगर पेडींग नाही.

[१२] उपरोक्त मिळकतीवर आमचे व्यतिरिक्त अन्य

इ ग त
११९७ /८७५
१९९५

अन्य कोणीही मालकी सत्ता सांगत नाही अगर मिळकतीत अन्य कोणीही हिस्सेदार नाही.

[१३] सदर मिळकतीवर आम्ही कुठल्याही प्रकार बँकेचे, सावकारीचे, अथवा अन्य कुठल्याही प्रकारचे कर्ज काढलेले नाही अथवा कुठलयाही कर्जासाठी उपरोक्त मिळकत तारण देण्याचे गहाण देण्याचे कबुल केलेले नाही.

[१४] सदर मिळकत/मिळकती अथवात्याचे क्षेत्रफळ ॲक्वायर/रिझर्व्ह रिक्वीझिशन झालेली नाही अथवा त्या संबंधी कोणतीही नोटीस आम्हांस आलेली नाही.

[१५] उपरोक्त मिळकती मध्ये कुळ नव्हता व नाही त्यामुळे मुंबई कुळ कायदयाचे संदर्भात मुंबई कुळ कायदयाचे कुठलेही निर्बंध मिळकतीला लागु नाही.

[१६] उपरोक्त मिळकत आदिवासाची नव्हती व नाही अथवा त्या संदर्भामध्ये त्या कायदयानुसार कुठल्याही प्रकारचे प्रोसिडींग कुठल्याही कोर्टात चालु नाही.

[१७] उपरोक्त मिळकत ही इनामती नव्हती व नाही त्यामुळे इनाम कायदा रद्द झाल्याबद्दलच्या कुठल्याही तरतुदी मिळकती संदर्भात लागु नाहीत.

[१८] मिळकत लाभ क्षेत्रात नाही अथवा रिसेटलमेंट कायदयाच्या तरतुदी मिळकतीस लागु नाहीत त्याबाबतचा

[९]..

इ ग त
१११७/e/९४
१९९४

त्याबाबचा दाखला आम्ही तुमचे भोगवटयात दिला आहे.

[१९] आम्ही जाहीर करतो की, मिळकत पुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे. या शब्दावर विसंबुन तुम्ही मिळकत आमचे पासुन खरेदी घेतली आहे. तथापि यापुढे आमचे मालकी हक्का बाबत काही वादनिर्माण झाल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदरखचाने निवारण करुन देवु तुमचे आमचे मालकी हक्काबाबत कोणीही काही वाद निर्माण झाल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदरखचानि करुन देवु तसेच आमचे आमचे मालकी हक्काबाबत कोणीही कुठल्याही प्रकारे वाद उपस्थितीत केल्यास हरकत केल्यास त्यामुळे तुमचे जे काही नुकसान होईल ते नुकसान, व्याजासह भरुन देण्यास आम्ही जबाबदार राहु.

[२०] तुम्ही सदरची मिळकत वाजवीपणे व खरेपणे बोनाफाइड इंडस्ट्रीज कारणांसाठी खरेदी घेत आहांत. त्यामुळे मुंबई कुळ कायदा कलम ६३ प्रमाणे परवानगी घेण्याची गरज नाही त्याकरीता महाराष्ट्र शासनाने आदेश काढलेले आहेत.

[२१] सदरची मिळकत तुम्हांस या खरेदीखताने कायमची फरोक्त खरेदी दिली आहे. ती उलट खरेदी देण्याची लेखी अगर तोंडी बोली वा करार नाही. खरेदीखतानंतर तुम्ही मिळकतीला तुमचे नांव लावुन घ्यावे त्यासाठी आम्ही सहकार्य करु.

इ ग त
९९/९ /१०/५४
१९९५

[२२] प्रस्तुत खरेदीखतासोबत खालीलप्रमाणे कागद पत्र तुमचे भोगवटयास दिलेले आहेत.

१] ७/१२ चा उतारा.

२] नोंदीचे उतारे.

३] मोजणीचा नकाशा.

[२३] तसेच सदर मिळकतीचे टायटल सर्टिफिकेट हे पी. जी. धर्माधिकारी अॅडव्होकेट, इगतपुरी, जि. नासिक यांनी दिलेले आहेत.

[२४] वर नमुद केलेल्या मिळकतीचा आजपावेतोचा शेतसारा, कर वगैरे आम्ही भरलेला असुन येथुन पुढील येणारा कर, शेतसारा तुमचे तुम्ही भरीत जावा त्याचेशी आमचा कोणताही संबंध नाही.

[२५] सदर मिळकतीचे मुळ खरेदीखत मे. दुय्यम निबंधक सो, इगतपुरी जिल्हा नासिक यांचेकडे नोंदविले असुन त्याची नक्कल व मिळकतीचा ७/१२ चा उतारा, नोंदी इत्यादी कागदपत्र तुमचे ताब्यात दिलेले आहेत.

[२६] उपरोक्त मिळकतीचे खरेदीखताचा सर्वस्वी तो खर्च म्हणजेच लिहिणावळ, नोंदणावळ, वकील फी, टायपिंग फी इत्यादी सर्वस्वी तो खर्च हा तुम्ही केला असुन सोसलेला आहे.

[२७] मिळकतीचा भरण्याचा तपशील.

इ ग त
११७/१९९५
११९५

२४९४६.५५/- श्री. मारुती बाळु तोकडे यांना कॅनरा बॅंक सातपुर शाखेवरील चेक नं. ०६३०२३८ अन्वये दि. १०/१०/९५ अन्वये मिळाला.

२४९४६.५५ श्री. गणपत बाळु तोकडे यांना कॅनरा बॅंक सातपुर शाखेवरीलचेक नं. ०६३०२३९ दि. १०/१०/९५ अन्वये मिळाला.

२४९४६.५५ भागाबाई बाळु तोकडे यांना कॅनरा बॅंक सातपुर शाखेवरील चेक नंबर ०६३०२४० दि. १०/१०/९५ अन्वये भरणा मिळाला.

१५००/- श्री. चंद्रसेन शंकरराव रोकडे यांना कॅनरा बॅंक, सातपुर शाखेवरील चेक नंबर ०६३०२५ दि. १०/१०/९५ अन्वये भरणा मिळाला.

१५००/- श्री. चंद्रकांत त्र्यंबक राजेबहादर यांना कॅनरा बॅंक, सातपुर शाखेवरील चेक नंबर ०६३०२६ अन्वये दि. १०/१०/९५ अन्वये भरणा मिळाला.

७७,८३९.६५/- येणेप्रमाणे भरणा पावला असुन भरण्या बाबत काही एक तक्रार नाही.

[२८] सदर खरेदीखत हे आमचेवर व आमचे पश्चात आमचे वालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील.

येणेप्रमाणे सदरचे फरोक्त खरेदीखत हे आमचे राजीखुशीने व स्वसंतोशाने कोणाचेही धाक दडपणास बळी न पडता मुक्त संमतीने लिहून देवुन वाचुन पेवुन समजुन

[१२]..

INDIA NON JUDICIAL

१०० रु. Rs 100

सत्यमेव जयते
भारत

एक सौ रूपये ONE HUNDRED RUPEES

कमी पडलेले मुद्रांक शुल्क

C. T. Raje

| इ | ग | त |
|---|---|---|
| ७७६७ /९२/९५ | | |
| १९९५ | | |

INDIA NON JUDICIAL

१०० रु. सत्यमेव जयते भारत Rs 100

एक सौ रुपये ONE HUNDRED RUPEES

१-०१- ५१७०१६५

१९८८

ज्योती ट्रेडर्स, प्रदीप रकाटे

नाशिक

Wakale

कसी पडलेले मुद्रांक शुल्क.

C. T. Pusalkar

| इ ग त |
|---|
| ११८७/१३/९५ |
| १९९५ |

SEAL OF ... ACQUITTAL ... ITPURI

...स्टेशन रोड डेवा/१८४०/११८

••[१२]••

उमजुन लिहून दिलेले असुन त्याचे सत्येतार्थ खालील सहया करणा-या साक्षीदारा समक्ष आम्ही आमच्या सहया या खरेदीखतावर केल्या असे.

हे फरोक्त खरेदीखत

ता. मजकुर :-

* लिहून देणार *

१. मारुती बाळू तोकडे
[मारुती बाळू तोकडे]

२. ___
[ गणपत बाळू तोकडे]

३. ___
भागाबाई बाळू तोकडे]

* संमतीदेणार *

१. [signature]
[श्री. चंद्रसेन शंकरराव रोकडे]

२. C. T. Raj [signature]
[श्री. चंद्रकांत त्र्यंबक राजेबहादर]

* साक्षीदार *

१. ___ २. [signature]

भागिरथीबाई काशिनाथ बाळू तोकडे ना सही असे

इ ग त
१९७९ /१९९
१९९५

१) मारुति बाळू तोकडे
वय-५०वर्षे, नोकरी
रा० देवळे ता० इगतपुरी
२) गणपत बाळू तोकडे
वय-...वर्षे, ...
रा० देवळे, ता० इगतपुरी
३) मनाबाई बाळू तोकडे
वय-६५वर्षे, घरकाम
रा० देवळे ता० इगतपुरी
४) चंद्रसेन शंकरराव रोकडे
वय-५०वर्षे, शेती रा०
खादूरवंद इगतपुरी (संमती देणार)
५) ...
वय-५४, शेती, रा० ... नाशिक.

दस्तऐवज करुन देणार............

तथाकथित खरेदीखताचा
दस्तऐवज करुन दिल्याचे कबूल
करतात. व अ.नं. २,३ अं० ठसा देतात.

१) मारुति बाळू तोकडे

२)

३)

४) ...

५) ...

१) बळवंत भाऊराव जाधव
वय-५२वर्षे, शेती,
रा० शिवाजी चौक, बोधी...
इगतपुरी
२) ...
वय-६०वर्षे, शेती,
रा० देवळे, ता० इगतपुरी
जि. नाशिक

असे निवेदन करित आहेत की ते
दस्तऐवज करुन देणाऱ्या उपरिनिर्दिष्ट
इसमास व्यक्तिशः ओळखतात
व त्यांची ओळख देतात

१) ...

२) ...

दिनांक १० माहे ऑक्टोबर १९९५

दुय्यम निबंधक, इगतपुरी

पुस्तक क्रमांक १ वे
क्रमांक ११२७ वर नोंदला
दिनांक १० माहे १० सन १९९५

दुय्यम निबंधक, इगतपुरी

इ ग त
११२७ /१९९५